नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 12/02/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

1) पो.स्टे. बेला – दिनांक 11/02/2021 चे 14.00 वा. चे सुमारास पो.स्टे. बेला हद्दीत फिर्यादीयांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला संशयीत आरोपी नामे– करण भलावी याने तिला कशाचेतरी आमीष दाखवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठेंगणे हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही – दिनांक 11/02/2021 चे 09.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही कॉलेजला जातो म्हणुन घरून निघुन गेली परंतु घरी परत आली नाहि. फिर्यादींच्या मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि शुभांगी तकीत या करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर मौजा अरोली येथे दिनांक 15/01/2021 चे 13.30 वा. ते दिनांक 16/01/2021 चे 12.00 वा. पर्यंत फिर्यादी राहुल देवचंद चवरे, वय 24 वर्ष, रा. मसला ता रामटेक याला आरोपी नामे– विजय कुमार, रा. राजस्थान याने फोन करून फेसबुक ऑनलाईन मार्केट प्लेसवर एक हिरो कंपनीची एचएफ मोटरसायकल किंमती 30,000/–रू. मध्ये विकण्याकरीता उपलब्ध असल्याचे सांगितले. त्यावरून फिर्यादीने आरोपीचे आयसीआयसीआय या बैकेच्या खात्यामध्ये 30,000/– रू पाठविण्यास सांगितले. त्यावरून फिर्यादीने आरोपीचे नमुद अकाउंट नंबरवर रूद्राक्ष नेट कॅफे अरोली येथुन 30,000/– रू पाठविले. परंतु 20 दिवसानंतर ही आरोपीने फिर्यादीला मोटार सायकल न पाठवुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. मकेश्वर हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 05 कि. मी. मौजा पाचगाव येथे दिनांक 10/02/2021 चे 21.30 वा. दरम्यान फिर्यादी हा जेवन आनण्याकरिता गेला असता लक्ष्मी राकेश सुर्यवंशी(मृतक), वय 35 वर्ष, रा. गांधीबाग डागा हॉस्पीटल जवळ नागपूर हिने फिर्यादीच्या राहत्या घरी हॉलमध्ये सिलींग फॅनला ओढणीने गळफास घेवल्याने ती मृत अवस्थेत आढळुन आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महेन्द्रसिंग कवडुसिंग चव्हाण, वय 50 वर्ष, रा. पाचगाव खैरी, बिजेवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक गजानन बोन्द्रे 9881241089 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर